सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १८(२)] शुक्रवार, जुलै २३, २०१०/श्रावण १, शके १९३२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक २९

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**— महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. | **पृष्ठे** १-५ |

दिनांक २२ जुलै २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**"
दिनांक २३ जुलै २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

### महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात सुधारणा करण्यासाठी तत्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ८ जुलै २०१० रोजी महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ;

१९९८ चा महा. १७.

२०१० चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ८ जुलै २०१० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १६ मध्ये,— १९९८ चा महा. १७.

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१) कुलपती हा, कुलगुरूची नेमणूक पुढील पद्धतीने करील :—

(अ) कुलगुरूची नेमणूक करण्यासाठी कुलपतींना योग्य अशा नावांची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :—

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असेल किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायमूर्ती असेल किंवा पशुसंवर्धन किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र किंवा मत्स्यव्यवसाय या क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीचा विख्यात संशोधक असेल किंवा कृषी क्षेत्रात किंवा तत्संबंधित क्षेत्रात त्याला पद्म पुरस्कार मिळाला असेल ;

(दोन) राज्य शासनाने, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, विद्यापीठाची कार्यकारी परिषद व विद्याविषयक परिषद यांनी संयुक्तपणे नामनिर्देशित केलेला सदस्य, जो भारतीय पशुवैद्यक संशोधन संस्था, इज्जतनगर, राष्ट्रीय दुग्धव्यवसाय संशोधन संस्था, करनाल किंवा केंद्रीय मत्स्यव्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांसारख्या पशुवैद्यक शास्त्र किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र किंवा मत्स्यविज्ञान या क्षेत्रातील ख्यातनाम राष्ट्रीय संस्थेचा किंवा संघटनेचा संचालक किंवा प्रमुख असेल ;

(तीन) महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागातील सचिव (पदुम) किंवा शासनाने नामनिर्देशित केलेला शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी ;

(ब) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा समितीचा अध्यक्ष असेल ;

(क) नामनिर्देशित केलेला सदस्य हा विद्यापीठाशी किंवा कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेशी संबंधित नसलेली व्यक्ती असेल ;

(ड) समितीचे सर्व तीन्ही सदस्य उपस्थित असल्याखेरीज समितीची कोणतीही बैठक घेतली जाणार नाही. " ;

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

" (२) नामिका तयार करण्याची प्रक्रिया ही कुलगुरूचे पद रिक्त होण्याच्या संभाव्य दिनांकाच्या किमान तीन महिने पूर्वी सुरू करण्यात येईल आणि ती कुलपतीने निश्चित केलेल्या कालमर्यादेच्या आत पूर्ण करण्यात येईल. तथापि, कुलपतीला निकडीच्या परिस्थितीत तसे करणे आवश्यक असेल तर अशी कालमर्यादा वाढविता येईल ; तथापि, अशा रीतीने वाढविण्यात आलेला कालावधी एकूण तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(२अ) समिती, कुलपतीच्या विचारार्थ, कमीतकमी पाच योग्य व्यक्तींच्या नामिकेची कुलगुरू म्हणून नेमणूक केली जाण्यासाठी शिफारस करील. अशा प्रकारे शिफारस करण्यात आलेली नावे, कोणताही पसंतीक्रम न दर्शविता वर्णक्रमानुसार नमूद केलेली असतील. नामिकेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या योग्यतेची सविस्तर माहिती अहवालासोबत असेल.

(२ब) कुलपतीस, अशा नामिकेतील उक्त व्यक्तींमधून एकाची कुलगुरूच्या पदासाठी निवड करता येईल व तिची अशा पदावर नेमणूक करता येईल. नामिकेतील व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती कुलपतीस मान्य नसेल किंवा कुलपतीने कुलगुरूच्या पदासाठी निवड केलेल्या व्यक्तीची कुलगुरूचे पद स्वीकारण्याची इच्छा नसेल तर, कुलपतीस त्याच समितीमधून किंवा या प्रयोजनार्थ नवीन समिती घटित झाल्यावर अशा नवीन समितीमधून नवीन नामिका करण्यास फर्मावता येईल.

(२क) कुलगुरू म्हणून नेमणुकीसाठी समितीद्वारे शिफारस केलेली व्यक्ती,—

(अ) प्रख्यात विद्वान असेल व उच्च दर्जाचा प्रशासक असेल ;

(ब) स्वतःच्या उदाहरणाने नेतृत्व करण्यास समर्थ असेल ;

(क) दूरदृष्टी देण्यास समर्थ असेल आणि ती दृष्टी विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या हितासाठी प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्षम असेल : आणि

(ड) राज्य शासनाने, कुलपतीशी विचारविनिमय करून, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेली अशी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारी असेल.

(२ड) सर्वात योग्य उमेदवारांची शिफारस व्हावी याची सुनिश्चिती करण्याकरिता, पात्रतेच्या शर्ती व कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी नावांच्या शिफारशींची प्रक्रिया यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात येईल.'';

(क) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

'' (४) कुलपतीस, कुलगुरूच्या पदाकरिता वर नमूद केलेल्या समितीद्वारे, शिफारस केलेल्या व्यक्तींमधून, एका व्यक्तीची नियुक्ती करता येईल. अशा प्रकारे नियुक्त केलेला कुलगुरू पाच वर्षांच्या मुदतीकरिता पद धारण करील आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही. '' ;

(ड) पोट-कलम (८) मधील, परंतुकामध्ये, '' सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही '' या मजकुराऐवजी, '' बारा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही '' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये,— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १८ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

'' (१) विद्यापीठाचा कुलसचिव हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल. तो, राज्य शासन, वेळोवेळी निश्चित करील अशा कालावधीकरिता, राज्य शासनाने नियुक्त केलेला शासनाच्या उप सचिवाच्या किंवा शासनाच्या अपर जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला राज्य शासनाचा प्रतिनियुक्तीवरील अधिकारी असेल. त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील. '';

(ख) पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात येतील ;

(ग) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (४) विद्यापीठाचा कुलसचिव हा, विद्यापीठाच्या सामाईक शिक्क्यानिशी, अभिलेखांचा आणि विद्या परिषद, त्याच्याकडे वेळोवेळी जिचा प्रभार देईल अशा विद्यापीठाच्या अन्य मालमत्तेचा परिरक्षक असेल आणि विद्यापीठाचे सर्व भूमिविषयक अभिलेख अद्ययावत ठेवण्याची तसेच जतन, देखरेख व परिरक्षण करण्याची जबाबदारी कुलसचिवाची असेल. तो, कार्यकारी परिषदेचा, विद्यापरिषदेचा व विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि सहायक कुलसचिव या दर्जाचे अधिकारी व त्या पदाशी समतुल्य अथवा त्यावरील पदे धारण करणारे अधिकारी वगळून अन्य कर्मचाऱ्यांच्या निवड समित्यांचा पदसिद्ध सचिव असेल, आणि कामकाजासंबंधीची सर्व उपलब्ध माहिती त्यांच्यापुढे सादर करणे त्यास बंधनकारक असेल. तो विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासंबंधीचे अर्ज स्वीकारील व सर्व पाठ्यक्रम, अभ्यासक्रम आणि आवश्यक असलेली इतर माहिती यासंबंधी कायमस्वरूपाचे अभिलेख ठेवील. " ;

(घ) पोट-कलम (५) वगळण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (८) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

" (९) कुलसचिव हा, कुलगुरूच्या अधीक्षणाधीन व नियंत्रणाधीन असेल. कुलसचिव हा, विद्यापीठाचा, विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि सहायक कुलसचिव या दर्जाचे अधिकारी व त्या पदाशी समतुल्य अथवा त्यावरील पदे धारण करणारे अधिकारी वगळून अन्य कर्मचाऱ्यांचा नियुक्ती व शिस्तविषयक प्राधिकारी असेल. कुलसचिवाच्या निर्णयाने व्यथित झालेल्या व्यक्तीला असा निर्णय कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कुलगुरूकडे अपील दाखल करता येईल.

(१०) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा परिनियमांचे, विनियमांचे उल्लंघन करून एखादा निर्णय घेतला असल्याचे अथवा एखादी कार्यवाही केली असल्याचे कुलसचिवास वाटत असेल तर, तो अशा कोणत्याही निर्णयाच्या अथवा कार्यवाहीच्या परिणामांबाबत राज्य शासनाला माहिती देऊन, कुलगुरूला कळवण्यास जबाबदार असेल. ".

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १९ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१) विद्यापीठाचा नियंत्रक हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल. तो, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा मुदतीसाठी, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या प्रतिनियुक्तीवरील भारतीय लेखा परीक्षा व लेखा सेवा अथवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यातील अधिकारी असेल. त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील. " ;

(ख) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ मध्ये नवीन कलम २५अ समाविष्ट करणे.

" **२५अ.** या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुलपतीशी विचारविनिमय करून, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती, राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील. ". विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ड) मध्ये, " तीन वर्षांचा " या मजकुराऐवजी, " पाच वर्षांचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २६ ची सुधारणा.

२०१० चा महा. अध्या. ८. **७.** (१) महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१० हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक २७(२)] शुक्रवार, जुलै २३, २०१०/श्रावण १, शके १९३२ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ५६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Animal and Fishery Sciences University (Amendment) Act, 2010 (Mah. Act No. XIX of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

### MAHARASHTRA ACT No. XIX OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 23rd July 2010).*

An Act to amend the Maharashtra Animal and Fishery Sciences University Act, 1998.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to amend the Maharashtra Animal and Fishery Sciences University Act, 1998, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Animal and Fishery Sciences University (Amendment) Ordinance, 2010, on the 8th July 2010 ;

Mah. XVII of 1998.

Mah. Ord. VIII of 2010.

AND WHEREAS, it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Animal and Fishery Sciences University (Amendment) Act, 2010.

(2) It shall be deemed to have come into force on the 8th July 2010.

Amendment of section 16 of Mah. XVII of 1998.

2. In section 16 of the Maharashtra Animal and Fishery Sciences University Act, 1998 (hereinafter referred to as "the principal Act"),— Mah. XVII of 1998.

(*a*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

" (*1*) The Vice-Chancellor shall be appointed by the Chancellor in the manner stated hereunder :—

(*a*) There shall be a Committee consisting of the following members to recommend suitable names to the Chancellor for appointment of the Vice-Chancellor, namely :—

(*i*) a member nominated by the Chancellor, who shall be the retired Judge of the Supreme Court or retired Chief Justice of a High Court or an eminent scientist of national repute in the field of Animal Husbandry or Dairy Technology or Fisheries or a recipient of *Padma* Award in the field of Agriculture or related field ;

(*ii*) a member nominated jointly by the Executive Council and the Academic Council of the University in the manner specified by the State Government by an order published in the *Official Gazzette*, who shall be the Director or Head of a National Institute or Organisation of repute in the area of a Veterinary Science or Dairy Technology or Fishery Science such as Indian Veterinary Research Institute (IVRI), Izzatnagar, National Dairy Research Institute (NDRI), Karnal or Central Institute of Fisheries Education (CIFE), Mumbai ;

(*iii*) the Secretary (ADF), in the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department of the Government of Maharashtra or any officer not below the rank of the Secretary to the Government, nominated by the Government ;

(*b*) The member nominated by the Chancellor shall be the Chairman of the Committee ;

(*c*) The members, nominated shall be the persons not connected with the University or any college or any recognised institution of the University ;

(*d*) No meeting of the Committee shall be held unless all the three members of the Committee are present. " ;

(*b*) for sub-section (*2*), the following sub-sections shall be substituted, namely :—

"(*2*) The process of preparing a panel shall begin at least three months before the probable date of occurrence of the vacancy of the Vice-Chancellor and shall be completed within the time limit fixed by the Chancellor. The Chancellor, however, may extend such time limit if in the exigency of the circumstances, it is necessary so to do, so however, that the period so extended shall not exceed three months in the aggregate.

(*2A*) The Committee shall recommend a panel of not less than five suitable persons for the consideration of the Chancellor for being appointed as the Vice-Chancellor. The names so recommended shall be in alphabetical order without any preference being indicated. The report shall be accompanied by a detailed write-up on suitability of each person included in the panel.

(*2B*) The Chancellor may select one of the said persons from such panel for the post of the Vice-Chancellor and appoint the person to such post. If the Chancellor does not approve any of the person in the panel or if the person selected by the Chancellor for the post of Vice-Chancellor is not willing to accept the office of the Vice-Chancellor, the Chancellor may call for a fresh panel, either from the same Committee or after constitution of a new Committee for the purpose, from such new Committee.

(*2C*) A person recommended by the Committee for the appointment as a Vice-Chancellor shall,—

(*a*) be an eminent academician and an administrator of high calibre ;

(*b*) be able to provide leadership by his own example ;

(*c*) be able to provide vision and have ability to translate the same into reality in the interest of students and society ; and

(*d*) possess such educational qualifications and experience as may be specified by the State Government, by an order published in the *Official Gazette*, in consultation with the Chancellor.

(*2D*) The eligibility conditions and the process for recommendation of names for appointment as a Vice-Chancellor shall be given wide publicity to ensure the recommendation of most suitable candidates. ";

(c) for sub-section (4), the following sub-section shall be substituted, namely :—

"(4) The Chancellor may appoint a person for the post of Vice-Chancellor, from amongst the persons recommended by above-mentioned Committee. The Vice-Chancellor so appointed shall hold office for a term of five years and shall not be eligible for re-appointment." ;

(d) in sub-section (8), in the proviso, for the words "shall not exceed six months", the words "shall not exceed twelve months" shall be substituted.

Amendment of section 18 of Mah. XVII of 1998.

3. In section 18 of the principal Act.—

(a) for sub-section (1), the following sub-section shall be substituted, namely :—

"(1) The Registrar of the University shall be a whole time salaried officer of the University. He shall be an officer of the State Government not below the rank of Deputy Secretary to the Government or Additional Collector to the Government, appointed by the State Government on deputation, for such period as the State Government may, from time to time, fix. The terms and conditions of service of the Registrar shall be such as the State Government may determine." ;

(b) sub-sections (2) and (3) shall be deleted ;.

(c) for sub-section (4), the following sub-section shall be substituted, namely :—

" (4) The Registrar of the University shall be the custodian of the records including common seal of the University and such other property of the University as the Academic Council may, commit to his charge, from time to time, and it shall be the responsibility of the Registrar to keep up-to-date all land records of the University, and its upkeep, care and maintenance. He shall be *ex-officio* Secretary of the Executive Council, the Academic Council and Selection Committees for the academic staff and employees of the University other than the officers of the rank of Assistant Registrar and other officers holding posts equivalent thereto or above, and shall be bound to place before them all available information of the business. He shall receive applications for entrance to the University and shall keep a permanent record of all courses, curricula and other information as may be necessary.";

(d) sub-section (5) shall be deleted ;

(*e*) after sub-section (*8*), the following sub-sections shall be added, namely :—

"(*9*) The Registrar shall be under the superintendence and control of the Vice-Chancellor. The Registrar shall be the appointing and the disciplinary authority of the employees of the University, other than the academic staff and officers of the rank of Assistant Registrar and other officers holding posts equivalent thereto or above. An appeal by a person aggrieved by the decision of the Registrar, may be preferred, within thirty days from the date of communication of such decision, to the Vice-Chancellor.

(*10*) The Registrar shall be responsible for reporting to the Vice-Chancellor the consequences of any decision or action taken by any authority of the University, which he feels is in contravention of the provisions of this Act or the Statutes, Regulations, under intimation to the State Government.".

**4.** In section 19 of the principal Act,— *Amendment of section 19 of Mah. XVII of 1998.*

(*a*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

"(*1*) The Comptroller of the University shall be whole-time salaried officer of the University. He shall be an officer belonging to the Indian Audit and Accounts Service or the Maharashtra Finance and Accounts Service appointed by the State Government on deputation, for such period as the State Government may, from time to time, fix. The terms and conditions of service shall be such as the State Government may determine." ;

(*b*) sub-section (*4*) shall be deleted.

**5.** After section 25 of the principal Act, the following section shall be inserted, namely :— *Insertion of new section 25A in Mah. XVII of 1998.*

"**25A.** Notwithstanding anything contained in any other provisions of this Act, the State Government may, in consultation with the Chancellor, by an order published in the *Official Gazette*, specify the eligibility conditions for being elected or nominated as a member of any authority of the University. ". *Power of Government to specify eligibility conditions for being member of any authority of University.*

**6.** In section 26 of the principal Act, in sub-section (*2*), in clause (*d*), for the words " three years " the words " five years " shall be substituted. *Amendment of section 26 of Mah. XVII of 1998.*

Repeal of Mah. Ord. VIII of 2010 and saving.

**7.** (*1*) The Maharashtra Animal and Fishery Sciences University (Amendment) Ordinance, 2010, is hereby repealed. Mah. Ord. VIII of 2010.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.